P.R.O Office ,Crime Branch,Pimpri Chinchwad Address:- Office Of The Commissioner Of Police , Premlok Park Chinchwad, Maharashtra - 411033

**प्रेसनोट** **दिनांक – ०९/०४/२०२५**

**"मा. मुख्यमंत्री सो यांचा १०० दिवशीय कृती कार्यक्रम अंतर्गत पिंपरी चिंचवड आयुक्तालयामध्ये पोलीस पाल्यांकरीता रोजगार मेळाव्याचे आयोजन "**

पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्त श्री. विनयकुमार चौबे यांचे संकल्पनेतून पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्तालयामध्ये **"मा. मुख्यमंत्री सो यांचा १०० दिवशीय कृती कार्यक्रम अंतर्गत पिंपरी चिंचवड आयुक्तालयामध्ये पोलीस पाल्यांकरीता रोजगार मेळाव्याचे आयोजन"** एस.एन.बी.पी. इंटरनॅशनल स्कुल, रहाटणी, पुणे येथे आज रोजी आयोजित करणेत आला होता.

पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्तालयामध्ये कार्यरत आजी, माजी अधिकारी व अमंलदार यांच्या पाल्यांना रोजगाराची संधी उपलब्ध करुन दयावी व आपले दैनंदिन कामकाज करीत असताना एक कुटुब प्रमुख म्हणून पोलीस आयुक्त श्री. विनयकुमार चौबे यांनी त्यांचे प्रति असलेली आपली बांधिलकीही जोपासली.

सदर कार्यक्रमास मा.पोलीस आयुक्त, श्री विनय कुमार चौबे, यांनी पिंपरी चिंचवड आयुक्तालयातील विविध कंपन्यामध्ये एच.आर. यांच्या आवश्यकतेनुसार कंपनीमध्ये जास्तीत जास्त पोलीस पाल्यांना रोजगार उपलब्ध करुन दिला. तसेच मा.पोलीस आयुक्त, श्री विनय कुमार चौबे, यांनी पोलीस पाल्यांना मिळालेल्या संधीचे सोने करावे तसेच आपली मेहनत, अपार कष्ट, शिस्त व जबाबदारीचे पालन करुन आपला व नियुक्त होणा-या कंपनीचा उत्कर्ष व्हावा या ध्येयाने प्रेरित होऊन आपले काम करावे असे मार्गदर्शन केले.

सदर कार्यक्रमास मा.पोलीस आयुक्त, श्री विनय कुमार चौबे, मा. श्री. वसंत परदेशी, अपर पोलीस आयुक्त, श्री. डॉ. शिवाजी पवार, पोलीस उपायुक्त, परि -३, श्री. विशाल गायकवाड, पोलीस उपायुक्त, परि-२, श्री. सुनिल कु-हाडे, सहायक पोलीस आयुक्त. सदर रोजगार मेळाव्यास टाटा मोटार्स, महिंद्रा ॲण्ड महिंद्रा,बजाज, हुंडाई, लुमॅक्स या नावाजलेल्या कंपन्यासह एकुण ३७ विविध कंपन्यांचे प्रतिनिधी, एच.आर. व २५० पोलीस पाल्य उपस्थित होते. उपस्थित उमेदवार पैकी १३६ पाल्यांची निवड करण्यात आली, तसेच मुलाखतीच्या दुस-या व तिस-या व चौथ्या फेरीसाठी ५२ उमेदवारांची निवड होऊ शकते. श्री. विशाल गायकवाड, पोलीस उपायुक्त, परि – २ यांनी सदर कार्यक्रमाचे प्रास्ताविक केले तर श्री. डॉ. शिवाजी पवार, पोलीस उपायुक्त, परि -३, यांनी आभार प्रदर्शन केले.

**जनसंपर्क अधिकारी**
**पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्तालय.**